आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

१७ जून २०२५ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- महाराष्ट्र कृषि- कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण २०२५-२०२९ला मंत्रिमंडळाची मंजुरी/ग्रामपंचायत स्तरावर स्वयंचलित हवामान केंद्रं उभारण्यासाठी महावेध प्रकल्पाला मुदतवाढ

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी कॅनडामध्ये कनानास्किस इथं होणाऱ्या G-7 शिखर परिषदेत सहभागी होणार

- जनगणना प्रक्रियेविषयी काँग्रेस जनतेची दिशाभूल करीत असल्याचा भाजपाचा आरोप

- अमरनाथ यात्रेच्या सुरक्षेसाठी दोन्ही यात्रामार्ग नो फ्लाईंग झोन घोषित

**आणि**

- राज्यात पावसाची विश्रांती/ पुढचे दोन दिवस ५ जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट जारी

**<><><><>**

महाॲग्री-एआय (MahaAgri-AI), अर्थात महाराष्ट्र कृषि- कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण २०२५-२०२९ला राज्य मंत्रिमंडळानं आज मंजुरी दिली. यामुळे कृषि क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानाचा वापर करून परिवर्तन घडवता येईल. कृत्रिम बुद्धीमत्ता, निर्मितीक्षम कृत्रिम बुद्धीमत्ता, इंटरनेट ऑफ थिंग्ज, ड्रोन, संगणकीय दृष्टीक्षमता, रोबोटिक्स, पूर्वानुमान विश्लेषण यांचा वापर करत, राज्यातले ॲग्रीस्टेक, महा-ॲग्रीस्टेक, महावेद, क्रॉपसॅप, ॲगमार्कनेट, डिजिटल शेतीशाळा, महा-डिबीटी यांसारखे प्रकल्प पुढं न्यायला मदत होणार आहे.

आज झालेल्या बैठकीत इतरही महत्वाचे निर्णय मंत्रिमंडळानं घेतले. त्यानुसार केंद्र सरकारच्या WINDS, म्हणजे Weather Information Network Data System प्रकल्पाअंतर्गत ग्रामपंचायत स्तरावर स्वयंचलित हवामान केंद्रं उभारली जाणार आहेत. यासाठी महावेध प्रकल्पाला मुदतवाढ द्यायचा निर्णय यावेळी झाला.

**<><><><>**

सागरी सुरक्षेला राज्य सरकारनं नेहमीच प्राधान्य दिलं असून गस्ती नौका या सागरी सुरक्षेच्या दृष्टीने टाकलेलं पाऊल आहे, असं नितेश राणे म्हणाले. मुंबईमधे भाऊचा धक्का

इथं गस्ती नौकेची पाहणी केल्यानंतर ते बोलत होते. सागरी सुरक्षेच्या दृष्टीनं राज्यात ड्रोन टेहळणी सुरक्षा यंत्रणा निर्माण करण्यात आली आहे. या यंत्रणेला अधिक बळकटी देण्यासाठी नवीन हायस्पीड गस्ती नौका तैनात करण्यात येत आहेत. अशा १५ नौका तैनात करण्यात येणार असून पहिल्या टप्प्यात पाच नौका तैनात करण्यात आल्या आहेत. या नौकांमुळे अवैध मासेमारी रोखण्यासह किनारपट्टीवरील सुरक्षा आणखी मजबूत होणार आहे. तसंच या नौकांमुळे मच्छिमारांचीही सुरक्षा होणार आहे, असं राणे म्हणाले.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी कॅनडाच्या दोन दिवसांच्या दौऱ्यासाठी आज कॅलगरी इथं पोहोचले. संध्याकाळी कनानास्किस इथं होणाऱ्या G-7 शिखर परिषदेत ते सहभागी होणार आहेत. कॅनडाचे प्रधानमंत्री मार्क कार्नी यांच्यासह सदस्य देशांच्या इतर नेत्यांबरोबर ते द्विपक्षीय चर्चा करतील. त्यानंतर प्रधानमंत्री मोदी उद्या क्रोएशियाची राजधानी झाग्रेब इथं पोहचतील.

**<><><><>**

पश्चिम आशियातल्या वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, G7 देशांच्या नेत्यांनी आज एक संयुक्त निवेदन जारी केलं. त्यात इस्राएलच्या स्वसंरक्षणाच्या हक्काला पाठिंबा दर्शवला असून या प्रदेशात अस्थिरता आणि दहशतीचं वातावरण निर्माण करण्यासाठी इराणला जबाबदार धरलं आहे.

दरम्यान, इस्त्राईल आणि इराण यांच्यातला संघर्ष वाढत असून तिथल्या भारतीय नागरिकांना मदत करण्यासाठी चोवीस तास नियंत्रण कक्ष स्थापन केला आहे.

**<><><><>**

गेल्या ११ वर्षांच्या कार्यकाळात केंद्रसरकारने सार्वजनिक आरोग्यसेवेसाठी भरीव उपाययोजना केल्या आहेत. ऐकूया अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून….

- **व्हॉईस कास्ट-**
- **<><><><>**

जनगणना प्रक्रियेविषयी कॉँग्रेस जनतेची दिशाभूल करत असल्याचा आरोप भाजपानं केला आहे. पक्षाचे प्रवक्ते सुधांशु त्रिवेदी यांनी आज नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत सांगितलं

की, सरकारनं जनगणना करण्याची घोषणा केली असून सामाजिक, आर्थिक आणि जातीय जनगणना होईल, असं स्पष्ट केलं आहे.

केंद्र सरकारनं काल जनगणनेची अधिसूचना जारी केली, त्यात जातनिहाय जनगणना होईल, असा स्पष्ट उल्लेख नसल्याचा दावा काँग्रेस नेते सचिन पायलट यांनी केला आहे. त्यावर त्रिवेदी उत्तर देत होते. जातनिहाय जनगणनेचं काम तेलंगण सरकारनं उत्कृष्टरीत्या केल्याचं पायलट यांनी म्हटलं आहे, त्यावर ते केवळ सर्वेक्षण होतं. जनगणना केंद्र सरकारच्या कार्यकक्षेत येते, असं त्रिवेदी म्हणाले.

**<><><>**

अमरनाथ यात्रेदरम्यान सुरक्षेचा उपाय म्हणून आजपासून जम्मू काश्मीर प्रशासनाने यात्रेचा मार्ग नो- फ्लाईंग झोन घोषित केला आहे. पहलगाम आणि बालताल या दोन्ही ठिकाणाहून जाणाऱ्या रस्त्यांना हा निर्णय लागू आहे. या मार्गावर यूएव्ही, ड्रोन किंवा तरंगते फुगे सोडण्यावर बंदी राहील. मात्र सुरक्षा यंत्रणाना या नियमातून सूट राहील. अमरनाथ यात्रा येत्या ३ जुलैपासून सुरु होत असून ती येत्या ९ ऑगस्टपर्यंत चालेल. नो - फ्लाईंग झोनचा नियम १ जुलैपासून १० ऑगस्टपर्यंत अमलात राहील. अमरनाथ यात्रेच्या सुरक्षेच्या दृष्टीनं यंदा विशेष व्यवस्था करण्यात आली असून निमलष्करी दलांच्या ५८० तुकड्या यात्रामार्गावर तैनात करण्यात येणार आहेत.

**<><><>**

अहमदाबाद विमान अपघातातल्या १४४ मृतांची डीएनए चाचणीद्वारे ओळख पटवण्यात आली आहे. त्यापैकी ८३ मृतदेह मृतांच्या कुटुंबियांना सुपूर्द करण्यात आले आहेत, अशी माहिती गुजरातचे आरोग्यमंत्री ऋषिकेश पटेल यांनी दिली आहे. उर्वरित मृतदेह योग्य प्रक्रिया आणि ओळख पूर्ण झाल्यानंतर लवकरच संबंधित कुटुंबियांच्या ताब्यात दिले जातील, असंही पटेल यांनी सांगितलं.

दरम्यान, या विमानाचे कप्तान सुमीत सभरवाल यांच्या मृतदेहाचा डीएनए जुळल्यानंतर त्यांचं पार्थिव त्यांच्या कुटुंबियांकडे सोपवण्यात आलं. मुंबईत आज त्यांच्या पार्थिवावर अंतिम संस्कार करण्यात आले.

**<><><>**

केरळच्या कोच्चीहून दिल्लीला जाणाऱ्या इंडिगो कंपनीच्या विमानात आज सकाळी बॉम्ब ठेवल्याची धमकी देण्यात आली. ही धमकी मिळाल्यानंतर विमान तातडीनं नागपूरच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळावर उतरवण्यात आलं. या विमानातील सर्व प्रवासी सुरक्षित आहेत.

**<><><>**

राज्यात विविध ठिकाणी सरकार विशेष शॉपिंग मॉल उभारणार असून, या ठिकाणी ग्राहकांना शेतकऱ्यांकडून शेत मालाची थेट खरेदी करता येईल, कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांनी ही माहिती दिली.

हे मॉल्स सार्वजनिक-खासगी भागीदारी तत्वावर बांधले जातील, आणि त्यासाठी कृषी विभागाच्या मालकीची ३५ हजार एकर जमीन उपलब्ध केली जाईल, असं ते म्हणाले. योजनेनुसार मॉलचा ५० टक्के भाग खासगी व्यावसायिकांच्या वापरासाठी दिला जाईल. यासाठी ३० ते ४० वर्षांचा करार केला जाईल. उरलेला ५० टक्के भाग केवळ शेतकरी संस्था, बचत गट, शेती उत्पादक कंपन्या आणि वैयक्तिक शेतकऱ्यांसाठी राखीव असेल असं त्यांनी सांगितलं.

**<><><>**

गेले काही दिवस जोरदार हजेरी लावून आज पावसानं राज्यात काहिशी विश्रांती घेतली आहे. रत्नागिरी जिल्ह्यात पाऊस ओसरला आहे. सर्व नद्यांची पाणीपातळीही कमी झाली आहे. आज दुपारी १२ वाजताच्या स्थितीनुसार, जिल्ह्यातल्या सर्व नद्यांची पाणीपातळी इशारा पातळीच्या खाली आली आहे.

मात्र पावसामुळे अनेक ठिकाणी रस्ते खचल्यामुळे वाहतुकीवर परिणाम झाला आहे. मुंबई- गोवा महामार्गावर खेड तालुक्यात वळंजवडी इथं १०० मीटर परिसरात भेगा पडल्यानं या वाहतूक एकेरी मार्गावरून सुरू आहे.

सातारा जिल्ह्यात पाटण-चिपळूण महामार्गावरही रस्ता पाण्याखाली जाऊन खचल्यानं वाहतूक पर्यायी मार्गावर वळवण्यात आली आहे.

मुंबई उपनगर जिल्ह्यात पाण्यात बुडून एकाचा आणि मातीच्या ढिगाऱ्याखाली सापडून एका व्यक्तीचा मृत्यू झाला. तर झाड पडून तीन व्यक्ती जखमी, स्लॅब पडून दोन व्यक्ती जखमी आणि भिंत पडून दोन व्यक्ती जखमी झाल्या आहेत. तसंच यवतमाळ

जिल्ह्यात पाण्यात बुडून एक व्यक्तीचा मृत्यू झाला असून धुळे जिल्ह्यात भिंत पडून चार प्राण्यांचा मृत्यू झाला आहे, अशी माहिती राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडून देण्यात आली आहे.

**<><><><>**

येत्या दोन दिवसांत कोकण आणि मध्य महाराष्ट्रात जोरदार पाऊस पडेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे. रत्नागिरी, पुणे, सातारा आणि कोल्हापूरचा घाट परिसर आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी पुढले २४ तास ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे.

**//<><><><>//**